# भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ मधील प्रकरण २१ अन्वये कलम २७४ अन्वये
# संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २१८/२०२५ चा अभिलेख
## मालवण येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

**निशाणी**

१) अपराध घडल्याचा दिनांक : १३/०९/२०२५

२) फिर्याद दाखल केल्याचा दिनांक : १३/०९/२०२५

३) फिर्यादीचे नाव, वय व पत्ता : साईनाथ रंगराव महेकर, वय २२ वर्षे
धंदा- नोकरी, जवान
नेमणुक-निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क,
कुडाळ क्र.३, जि. सिंधुदुर्ग.

४) आरोपीचे नाव, वय व पत्ता : राजेश संभाजी परब,
वय- ५० वर्षे, धंदा - शेती,
रा. घर नं. ३९१ चौके थळकरवाडी,
ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग

५) अपराधाचा तपशील :

तुम्ही दि. १३/०९/२०२५ रोजी मौजे चौके नारायणवाडी येथील एच.पी. पेट्रोल पंप९समोरील हॉटेल युगांतच्या मागील बाजूस तुमचे ताब्यात एका कापडी पिशवीमध्ये एकूण रक्कम रुपये ४,८००/- किंमतीच्या गोवा बनावटीच्या बॉब्स लेमन व्होडका असे इंग्रजी लेबल असलेल्या १८० मि.ली. मापाच्या दारुने भरलेल्या ४८ सिलबंद बाटल्या गैरकायदा बिगरपरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने आपल्या ताब्यामध्ये बाळगलेल्या स्थितीत मिळून आला व त्याद्वारे तुम्ही महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) द्वारे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

६) आरोपीचे प्रतिकथन :

प्रश्न क्र. १ : अभियोग पक्षाच्या कागदपत्रांच्या प्रती तुम्हाला मिळाल्यात काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.२ : अपराधाचा जो तपशील तुम्हाला वाचून व स्पष्ट करुन सांगण्यात आला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.३ : तुम्हाला गुन्हा मान्य आहे काय ?

उत्तर : मला गुन्हा मान्य नाही.

---------------

दिनांक : १५/०४/२०२६ (आरोपीची सही )

समक्ष,

( एम.के.फकीह )
न्यायदंडाधिकारी वर्ग-१, मालवण

आरोपीला गुन्हयाबाबतचा तपशिल वाचून दाखविला व मराठीतून समजावून सांगितला असता आरोपीने गुन्हा नाकबूल करुन अभियोग चालविण्याची तयारी दर्शविली.

( एम.के.फकीह )
दिनांक : १५/०४/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग-१, मालवण